पुढारी 13/04/2023

# 'क्राइम ब्रँच'कडून ४८ तासांत गुन्ह्याची उकल

## धर्माबाद प्रकरणातील ४ आरोपींना अटक

**नांदेड,पुढारी वृत्तसेवा :** कारेगाव फाटा ते धर्माबाद दुचाकीवर प्रवास करत असताना करखेली येथे चोरट्यांनी अडवून अजित माने या सराफा व्यावसायिकाचे ११ लाख रुपयांचे दागिने लुटून नेले होते. केवळ ४८ तासात या गुन्ह्याचा उलगडा करण्यात क्राईम ब्रँचला यश आले असून चार चोरट्यांना अटक करुन त्यांच्याकडून ८ लाख ७८ हजारांचा मुद्देमाल जप्त केला असल्याची माहिती पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या पत्रकार परिषदेला अपर पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, खंडेराय धरणे, धर्माबादचे पो.नि.अभिषेक शिंदे यांची उपस्थिती होती.

१० एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० वाजेच्या दरम्यान अजित माने हे दुचाकीवर जात असताना चार चोरट्यांनी त्यांची दुचाकी अडवून त्यांना खंजरचा धाक दाखवून त्यांच्याकडील ८६ ग्राम सोन्याचे दागिने आणि ८ किलो चांदीचे दागिने असा एकूण ११ लाख ३ हजार ६५० रुपयांचा ऐवज लुटून नेला होता. या प्रकरणी धर्माबाद पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. एसपी श्रीकृष्ण कोकाटे यांनी द्वारकादास चिखलीकर यांना चोरट्यांना अटक करण्याचे आदेश दिले होते. बुधवारी तपासादरम्यान चिखलीकर यांना खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीनुसार हस्सापूर येथून निखिल कुंटूरवार, वैभव जाधव, अनिल कोतवाल आणि एका विधिसंघर्ष बालकास ताब्यात घेतले. त्यांना विश्वासात घेऊन विचारले असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून ८६ ग्राम सोन्याचे दागिने आणि ५ किलो चांदीचे दागिने, एक मोबाईल असा एकूण ८ लाख ७८ हजार रुपयांचा ऐवज जप्त के ला आहे. तसेच पुढील तपासासाठी चारही आरोपींना धर्माबाद पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या चोरट्यांकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असल्याचे कोकाटे यांनी सांगितले.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकटे, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि.द्वारकादास चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली स.पो.नि.पांडुरंग माने, पोउपनि सचिन सोनवणे, सपोउपनि माधव कें द्रे, गंगाधर कदम, देवा चव्हाण, मोतीराम पवार, तानाजी येळगे, मारोती मोरे, अर्जुन शिंदे, गंगाधर घुगे, शेख कलीम यांच्या पथकाने ही कामगिरी के ली.